EAU/ICD/2020-21/87

# मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र./२०१९-२०

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०१९-२० मधील ०६ नोव्हेंबर, २०२० च्या बैठकीचे इतिवृत्त.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची आठवी बैठक शुक्रवार दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२० रोजी दुपारी ०३.०० वाजता आयोजित करण्यात आली. कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर उद्भावलेल्या परिस्थितीमुळे ही सभा क्लाउड व्हिडियो मिटींग (ZOOM APP) द्वारे घेण्यात आली. बैठकीमध्ये खालील मान्यवर उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरू) | सदस्य |
| ३. | प्रा. (डॉ.) अजय भामरे | सदस्य |
| ४ | प्रा. राजेश खरात | सदस्य |
| ५ | प्रा. माला लालवाणी | सदस्य |
| ६ | प्रा.(डॉ.) महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ७. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ८. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| ९. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| १०. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| ११. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १२. | प्रा. बि. एन. जगताप | सदस्य |
| १३. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १४. | डॉ. विनोद पाटील, संचालक - परीक्षा व मूल्यमापन मंडळ व प्रभारी कुलसचिव | सदस्य सचिव |
| १५. | श्रीमती कविता लघाटे (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

➢ **स्वागत**

प्रभारी कुलसचिव तथा सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरू करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली. मा. अध्यक्षांनी देखील उपस्थित सर्वांचे स्वागत करून सभेची कार्यवाही सुरू करण्यास अनुमती प्रदान केली.

➢ अनुपस्थिती :-

श्री. दिपककुमार मुकादम यांनी त्यांची अनुपस्थिती कळविल्याने त्यांना अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

➢ श्रध्दांजली

**श्री. विनायक पाटील**

ज्येष्ठ माजी मंत्री वनाधिपती श्री विनायक पाटील यांचे अल्पशा आजाराने दिनांक २३ ऑक्टोबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते.

**श्रीमती गीतांजली कांबळी**

मराठी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती गीतांजली कांबळी यांचे कर्करोगाने दिनांक २४ ऑक्टोबर २०२० रोजी निधन झाले.

**श्री केशुभाई पटेल**

गुजरातचे माजी मुख्यमंत्री श्री केशुभाई पटेल यांचे अल्पशा आजाराने दिनांक २९ ऑक्टोबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षांचे होते.

**माजी मंत्री जावेद खान**

कॅाग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री जावेद खान यांचे अल्पशा आजाराने दिनांक ३१ ऑक्टोबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते.

**पंडीत दिनकर पणशीकर**

जयपूर घराण्याचे ज्येष्ठ गायक आणि संगीतज्ञ पंडीत दिनकर पणशीकर यांचे दिर्घ आजाराने दिनांक ०२ नोव्हेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते.

वरील सर्व मान्यवरांच्या दुखःद निधनाबद्दल शोक व्यक्त करून सर्व दिवंगताना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब |
|---|---|
| | (कार्यकारी प्राधिकरणे विभाग) |
| बाब क्र.१ | दि. २८ ऑगस्ट, २०२०, ५ सप्टेंबर, २०२०, २९ सप्टेंबर, २०२० व १३ ऑक्टोबर, २०२० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर. |
| ठराव | दिनांक २८ ऑगस्ट, २०२०, ५ सप्टेंबर, २०२० व १३ ऑक्टोबर, २०२० रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. |

| | |
|---|---|
| | दिनांक २९ सप्टेंबर, २०२० रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तास खालील सूचनांसह मान्यता देण्यात आली.<br><br>१) पृष्ठ क्रमांक १, श्रध्दांजली अंतर्गत खालील व्यक्तींचा समावेश करण्यात यावा. "पंढरपूर येथील प्रसिध्द भागवताचार्य वासुदेव नारायण उर्फ वा.ना. उत्पात यांचे दिनांक २७ सप्टेंबर, २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते."<br><br>२) पृष्ठ क्रमांक ३, येथील बाब क्र. ५ मधील पृष्ठ क्रमांक ४ वरील शेवटची ओळ "श्री. रविकांत सांगुर्डे यांनी सदर ठरावास त्यांचा आक्षेप नोंदविला"<br>च्या ऐवजी<br>"NAEMD ही संस्था Coaching Class आहे असे म्हणून श्री रविकांत सांगुर्डे यांनी सदर ठरावास त्यांचा आक्षेप नोंदविला. तसेच श्री राजन कोळंबेकर यांनीही आक्षेप नोंदविला." असे वाचावे. |
| | (वित्त व लेखा विभाग) |
| **बाब क्र.२** | वित्त व लेखा समितीचे दि. ११ ऑगस्ट, २०२० चे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर. |
| **ठराव** | वित्त व लेखा समितीचे दि. ११ ऑगस्ट, २०२० चे इतिवृत्त मान्य करण्यात आले. |
| **बाब क्र.३** | वित्त व लेखा समितीचे दि. ७ ऑक्टोबर, २०२० चे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर. |
| **ठराव** | वित्त व लेखा समितीचे दि. ७ ऑक्टोबर, २०२० चे इतिवृत्त मंजूर करण्यात आले.<br>सदर बाब क्रमांक ९ मधील मुंबई विद्यापीठाच्या वतीने के.सी. महाविद्यालयाला देण्यात येत असलेले रूपये २,००,०००/- मान्य करण्यात आले, तथापि सदरबाबत सविस्तर माहिती सभागृहास संचालक, क्रिडा, मुंबई विद्यापीठ यांच्याकडून सादर करण्यास सांगण्यात आले. |
| | (वित्त व लेखा विभाग) |
| **बाब क्र.४** | कर्मचारी कल्याण निधीतून प्रा. एम.एम. शर्मा यांनी दिलेल्या रु.१०,००,०००/- (रु. |

| | |
|---|---|
| | दहा लाख) देणगीमधून शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आर्थिक मदत देण्याकरीता समिती गठीत करण्याबाबत. |
| ठराव | सदर बाबत चर्चेअंती कर्मचारी कल्याण निधीतून प्रा. एम.एम. शर्मा यांनी दिलेल्या रु.१०,००,०००/- (रु. दहा लाख) देणगीमधून शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आर्थिक मदत देण्याकरीता समितीवर सदस्य गठीत करण्याबाबत मा. कुलगुरूनां अधिकार प्रदान करण्यात आले व त्यांस प्रा.(डॉ) अजय भामरे यांनी अनुमोदन दिले. |
| | **(विद्यापीठ क्षेत्र विकास विभाग)** |
| बाब क्र.५ | Approval of lowest quotation submitted by M/s. Shiv Enterprises for the work of providing street light poles LED street light fittings cables etc. at various places at Vidyanagari Campus. |
| ठराव | सदर प्रस्ताव हा सन २०१८ च्या वर्षातील असल्याचे निर्दशनास आले. व्यवस्थापन परिषदेत हा प्रस्ताव एवढया उशीरा आल्याबद्दल विचारण केली गेली.<br><br>सदर बाबत चर्चेअंती, सदरहु प्रस्ताव विद्यमान कुलगुरू यांच्या कार्यकाळातील नसल्याने Refer Back करण्याचा ठराव करण्यात आला व या व्यतिरिक्त आणखी काही जुने प्रस्ताव (विषय) असतील तर त्याबाबत स्वतंत्र बैठक आयोजित करण्याचे सुचविण्यात आले व तेच विषय चर्चेस घेतले जातील असे ठरविण्यात आले. |
| | **(विद्यापीठ क्षेत्र विकास विभाग)** |
| बाब क्र.६ | Implementing Yulu Bike Scheme in Kalija Campus, University of Mumbai. |
| ठराव | सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. मा. कुलगुरुंच्या “Green Campus of University” या संकल्पनेअंतर्गत विद्यार्थी, कर्मचारी, पालक इत्यादींच्या सोयीसाठी अशा रितीचा उपक्रम निश्चितच राबवावा असे मत सर्वांनी मांडले. त्यानुसार सदर प्रकल्पाचा अभ्यास करण्यासाठी, निकष ठरविण्यासाठी खालील सदस्यांची समिती गठीत करण्यात आली.<br>१. श्री प्रदीप सावंत, निमंत्रक |

| | |
|---|---|
| | २. डॉ रविकांत सांगुर्डे, सदस्य<br>३. ॲड. निल हेळेकर, सदस्य<br><br>सदर समितीने आपला अहवाल १५ दिवसांत मा. कुलगुरू महोदयांना सादर करावा. सदर ठराव याच सभेमध्ये मंजूर करण्यात आला. |
| | **(मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था )** |
| बाब क्र.७ | Donation of Rs. 5 Cr. From Dr. S.A. Dave to Mumbai School of Economics for setting up Centre for Research and Teaching in Finance. |
| **ठराव** | सदरहु प्रस्तावाचे सर्व सदस्यांनी स्वागत केले. विद्यापीठातील काही विभाग हे त्यांच्या प्रयत्नांतून विद्यापीठासाठी निधी आणत आहेत. तसेच नवीन शैक्षणिक धोरणानुसार कालांतराने सर्व विभाग हे स्वायत्त होणार असल्याने असे उपक्रम स्तुत्यच आहेत असे अध्यक्षांनी नमुद केले.<br>चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की डॉ. दवे यांनी **मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था** यांना वित्त क्षेत्रात संशोधन आणि अध्ययन करण्यासाठी केंद्र उभारण्यास देऊ केलेली पाच करोडची मदत स्विकारावी व त्याबाबत डॉ. दवे यांना पत्र दयावे. |
| | **( शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (म.शि) )** |
| **बाब क्र.८** | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (AICTE) सुधारित शैक्षणिक अर्हता, पात्रता व अनुभव, इत्यादी सेवाशर्ती तसेच सातच्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणी मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत अभियांत्रिकी/ व्यवस्थापन/ औषध निर्माण शास्त्र/स्थापत्य शास्त्र महाविद्यालये/ संस्था व मुंबई विद्यापीठातील विविध विभाग इत्यादींना लागू करण्यासाठी मान्यता मिळण्याबाबत. |
| **ठराव** | सदर प्रस्ताव मान्य करण्यात आला. डॉ. नरवडे यांनी याबाबत विद्यापीठाचे अभिनंदन केले व सदरबाबत सर्व सबंधित महाविद्यालयांना परिपत्रक काढून कळवावे असे सूचविले. |

| | अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेले विषय |
|---|---|
| बाब क्र.१ | मौजे, झाराप ता. कुडाळ येथील मुंबई विद्यापीठ यांना भाडेपट्याने प्रदान करणेत आलेली सरकारी जमिन वैद्यकिय महाविद्यालयासाठी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, सिंधुदूर्ग यांना उपलब्ध करून देण्याबाबत. |
| ठराव | सदर बाबत खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला :- <br> The Management Council of University of Mumbai in principle agrees to the State Government Proposal sent by the Collector of Sindhudurga (dated 4th November, 2020) of University of Mumbai transferring the land allotted to it at Zarap (Dist. Sindhudurga) for establishment of Sub Campus at Zarap, in the larger interest of the State to construct the first Government Medical College and Hospital for the people of Sindhudurga, subject to the condition to the State Government making available, transferring and handling over equivalent land with clear title at good and convenient location in Sindhudurga District to University of Mumbai at the earliest for establishing Sub Campus of the University in Sindhudurga district. <br> तसेच असाही निर्णय घेण्यात आला की खाली नमूद सदस्यांची समिती गठीत करुन त्यांनी शासनाला पाठविण्याच्या पत्राचा मसुदा तात्काळ तयार करावा व सर्व सभासदांना पाठवून त्यांची संमती घ्यावी. <br> १. प्र-कुलगुरू <br> २. डॉ. बि. एन. जगताप <br> ३. श्री प्रदीप सावंत <br> ४. ॲड. निल हेळेकर |
| बाब क्र.२ | पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयातील सेवाजेष्ठ शिक्षकांना प्राधिकृत करणेसाठी विविध गटाकडून प्राप्त होणा-या पत्रा बाबत : |
| ठराव | सदर मुद्दयावर ॲड. निल हेळेकर यांनी असे सुचविले की विद्यापीठाच्या सबंधित विभागाकडे शिक्षक मान्यतांची माहिती असते, त्यावरुन या महाविद्यायातील |

| | |
|---|---|
| | शिक्षकांची सेवाज्येष्ठता ठरवावी आणि त्याप्रमाणे प्राधिकृत करावे. तसेच विविध गटांच्या सततच्या आंदोलनांमुळे विद्यापीठाला होत असलेल्या त्रासासाठी Civil Court मध्ये या सर्व गटांच्या विद्यापीठ प्रवेशांवर बंदी घालण्यासाठी injunction suit दाखल करावे. यास सर्वांनी सहमती दर्शवली.<br>चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या सबंधित महाविद्यालयांच्या शिक्षकांच्या सेवाज्येष्ठता यादीचा विद्यापीठाच्या CTAU विभागाने विद्यापीठाच्या नोंदी तपासुन व सखोल अवलोकन करुन सेवाज्येष्ठ शिक्षक ठरवून त्यास प्राधिकृत करावे. जर प्रथम सेवाज्येष्ठ शिक्षकाने नेमणूक स्विकारण्यास असमर्थता दर्शविल्यास पुढील सेवाज्येष्ठ शिक्षकास प्राधिकृत करण्यात यावे.<br>सदर ठराव याच सभेमध्ये मंजूर करण्यात आला. |
| बाब क्र.३ | गुंतवणुक समितीच्या दिनांक २८ ऑक्टोंबर, २०२० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर. |
| ठराव | गुंतवणुक समितीच्या दिनांक २८ ऑक्टोंबर, २०२० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेत मान्य करण्यात आले. |
| बाब क्र.४ | नॉननेट फेलॉशिप मिळण्यासाठी विद्यार्थ्यांनी केलेल्या निवेदनानुसार सर्वसामान्य (General Fund) निधीमधून नॉननेट/सेट फेलोशिप अदा करण्याबाबत. |
| ठराव | सदहु प्रस्तावाबाबत चर्चेअंती असे ठरले की वर्ष २०१८—२०१९ च्या विद्यार्थ्यांना जी फेलोशिप मिळत होती ती त्यांना त्यांची पात्रता व निकष तपासून विद्यापीठाच्या<br>सन 2019-20 साली विद्यापीठ इथून पुढे<br>फंडातून दयावी व ~~सन २०१९-२०२० च्या~~ विद्यार्थ्यांना नॉननेट/सेट फेलोशिप देण्यात येऊ नये व पुढील शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ पासून संशोधन व याबाबत मार्गदर्शक तत्वे ठरविण्यासाठी डॉ. बी.एन जगताप यांची समिती गठीत करण्यात आली. इतर सदस्य नेमणुकीचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. |
| बाब क्र.५ | To use the Services of M/s. Splash Gain for Online examination as of IDOL – November, 2020 and Henceforth. |
| ठराव | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |

| | |
|---|---|
| **बाब क्र.६** | मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव यांनी कुलगुरू महोदयांना लिहीलेले दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२० रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. सदर पत्रात मा. मंत्री महोदयांनी त्यांच्या निवासस्थानाचे दुरुस्ती काम सुरु असल्याने मुंबई विद्यापीठाच्या अधिपत्याखालील मरिन लाईन्स येथील क्रिडांगणाच्या आवारातील निवासस्थान सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे. सदर बाब निर्णय घेण्यासाठी व्यवस्थापन परिषदेपुढे सादर. |
| **ठराव** | सदर बाबत चर्चेअंती सर्वानुमते असे ठरले की, मुंबई विद्यापीठाच्या अधिपत्याखालील मरिन लाईन्स येथील क्रिडांगणाच्या आवारात असलेले मुंबई विद्यापीठाचे निवासस्थान हे प्र-कुलगुरूंना राहण्यासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. त्यामुळे सदर निवासस्थान मागू नये अशी माननीय मंत्रीमहोदय (उच्च व तंत्रशिक्षण) यांना विनंती करण्यात यावी असे ठरले. |

कुलसचिवांनी उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त करून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

19/11/20
-----------
उपकुलसचिव

------------
प्रभारी कुलसचिव

---------
प्र-कुलगुरू

**इतिवृत्त मंजूर**

--------
कुलगुरू